कार्यालय पोलीस उप अधिक्षक,लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,जालना दिनांक ०५/०२/२०१९

टोल फ्रि क्रमांक १०६४

कार्यालय दुरध्वनी क्र. :- ०२४८२-२२०२५२

तत्कालीन कार्याकारी अभियंता सा.बां.विभाग जालना जि,जालना श्री.पुरुषोत्तम लोटन देवरे **यांनी १,००,०००/- रुपयाच्या लाचेची मागणी केले प्रकरणी गुन्हा दाखल**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | श्री.पुरुषोत्तम लोटन देवरे, वय ५५ वर्षे,कार्याकारी अभियंता,सा.बां.विभाग,जालना रा.सहकार नगर, औरंगाबाद |
| २ | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दि.३१.०७.२०१८ रोजी आलोसे यांचे राहाते घरी सहकार नगर औरंगाबाद येथे. |
| ३ | लाचेची रक्कम | :- | १,००,०००/- रुपये |
| ४ | सापळा अधिकारी | :- | श्री.आर.डि.निकाळजे,पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना |

याबाबत हकीगत अशी आहे की, यातील तक्रारदार हे गुत्तेदारी करीत असुन त्यांनी बदनापुर तालुक्यातील चिखली, बदनापुर, नानेगांव, व गाडे जळगाव वाकुळणी रस्ता दुरुस्तीचे काम केलेले आहे. सदर रस्ता दुरुस्तीचे काम मजुर सहकारी सोसायटीने मिळालेले असुन तक्रारदारांनी सदरची कामे ही सब कॉन्ट्राक्टर म्हणुन केलेली आहेत. तक्रारदारच्या कामाचे बिल सत्तावीस लाख रुपयाचे असुन त्यापैकी कांही बिले श्री.देवरे यांनी मंजुर करुन दिले तेंव्हा तक्रारदार यांचेकडुन श्री.देवरे यांनी चार लाख रुपये घेतले होते. तक्रारदार यांचे आठ लाखाचे बिल सार्वजनिक बांधकाम विभाग जालना यांचेकडुन येणे बाकी होते. सदरील कामासाठी तक्रारदार हे कार्याकारी अभियंता श्री देवरे यांना भेटले असता श्री देवरे यांनी बिल काढुन देण्या करीता एक लाख रुपये दयाचे लागतील. तेंव्हा तक्रारदार हे श्री.देवरे यांना म्हणाले की, साहेब याआगोदरच मी आपणास चार लाख रुपये दिले आहेत आत्ता आणखी एक लाख रुपये जास्त होतात. त्यावेळी श्री.देवरे म्हणाले की, ते तुमच्या आगोदरचे बिल काढुन दिले त्याचे होते. आता तुमचे राहीलेले आठ लाख रुपये काढुन देण्याचे दयावे लागतील पैसे दिले तरच तुमचे बिल काढुन दिईन अन्यथा तुमचे काम होणार नाही. त्यावेळी तक्रारदार हे श्री.देवरे यांना म्हणाले की, साहेब सद्या माझ्याकडे पैसे नाहीत पैशाची व्यवस्ता करुन येतो. असे म्हणुन तक्रारदार हे तेथुन निघुन आले. तक्रारदार यांची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागा कडे तक्रार दिली.

दि.३१.०७.२०१८ रोजी श्री.देवरे,कार्यकारी अभियंता यांचे राहते घरी औरंगाबाद येथे जावुन श्री.देवरे यांची पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यात आली. पडताळणी दरम्यान पंचा समक्ष कार्यकारी अभियंता श्री.देवरे यांनी तक्रारदार यांचेकडे सदर कामासाठी १,००,०००/- रुपयाची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन ०५.०२.२०१९ रोजी कार्यकारी अभियंता,सा.बां.विभाग,जालना श्री.देवरे यांचे विरुध्द पोस्टे उस्मानपुरा जि.औरंगाबाद येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन अवाहन करण्यात येते की कोणी लोक सेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२-२२०२५२, तसेच टोल फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं.८९७५७६२९०६ पोलीस निरीक्षक मो.नं. ९८२३१४२६३२, ९७६७७४७७७४ वर संपर्क करावा.**

( रविंद्र डी.निकाळजे )
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना